जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर - ४१६००२
दुरध्वनी क्रमांक : 0231-2659232 टोल फ्री (1077)
Email: rainkolhapur@gmail.com

सत्यमेव जयते

जा.क्र. नैआ/कोरोना विषाणू/75/2020,

दिनांक :09/04/2020

वाचले :-

1. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897.
2. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34 मधील पोटकलम (c) व (m)
3. महाराष्ट्र शासन क्रं. कोरोना 2020.प्र.क्र.58/आरोग्य6 दिनांक 14 मार्च 2020
4. महाराष्ट्र शासन आदेश क्रं.40-3/2020-डी दि.24/3/2020
5. या कार्यालयाकडील बंदी आदेश क्रं. आधोव्यनिक/कोरोना विषाणू/30/2020, दिनांक :-13/03/2020.

**विषय :- कोरोना विषाणु (कोवीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**-: आदेश :-**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि. 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे.

ज्याअर्थी, कोल्हापूर जिल्हयातील कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी वाचले क्रं. 5 अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये पाच किंवा पाच पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येणेस मनाई करणेत आली आहे. ती, जिल्हयातील विविध राष्ट्रीयकृत बँकामध्ये प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेतील पात्र लाभार्थी हे पैसे काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोक एकत्र येवून गर्दी होत आहे असे माझे निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी, मी दौलत देसाई, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण , कोल्हापूर जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, वाचले क्रं.1 ते 4 नुसार मला प्रदान केले अधिकाराचा वापर करुन या अदेशाद्वारे खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

1. जिल्हयातील सर्व बँकांनी प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेतील पात्र लाभार्थ्यांची गावनिहाय यादी जिल्हा अग्रणी बँकेकडे त्वरीत सादर करावी. जिल्हा अग्रणी बँकेने सदरची यादी एकत्र करुन पोष्ट ऑफीसकडे जमा करावयात.
2. पोष्ट ऑफीसने इंडीया पोष्ट पेमेंट बँकच्या माध्यमातून लाभार्थ्यांना त्यांचे घरी जावून सदरची रक्कम आदा करावी.
3. वरील प्रमाणे लाभार्थ्यांना रक्कम देणेची कार्यवाही पोष्ट ऑफीस तसेच नेहमीप्रमाणे बँकाद्वारेही करणेत येईल.
4. वरील प्रमाणे कार्यवाही करीत असताना वाचले क्रं.5 अन्वये पारित करणेत आलेल्या बंदी आदेशाचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

या आदेशाचे उल्लंघन केलेस, संबंधिताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 अन्वये तसेच भारतीय दंडसंहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानन्यात येईल व पुढील कारवाई करणेत येईल.

सदराचा आदेश माझे सही शिक्यानिशी दिला असे आज दिनांक 09/04/2020.

(दौलत देसाई)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर.**

**प्रति,**
1. जिल्हा समन्वयक, कोल्हापूर जिल्हयातील सर्व बँका, कोल्हापूर.
2. द सिनीयर सुप्रिटेंडंट ऑफ पोष्ट ऑफीसेस, डिव्हीजनल ऑफीस, रमण मळा, कोल्हापूर.

**प्रत-**
1. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडीया, कोल्हापूर.
   2/- आपले अधिनस्त सर्व बँका, पोष्ट ऑफीस कार्यालयांना सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणे बाबत आपले स्तरावरुन सुचना देणेत याव्यात.
2. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर.
   2/- सदरचा आदेश स्थानिक वृत्त पत्रामध्ये बातमी स्वरुपात प्रसिध्द करणेत यावा.

Scanned by CamScanner